# जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी वाशिम यांचे कार्यालय

Ph.No-07252232852
E-mail-dydeowashim@gmail.com Fax No-07252232858

**क्रमांक कक्ष-21/सानि/कावी-482 /2017** **दिनांक:- 21/09 /2017**

**फेर ई-निविदा.**

वित्तीय वर्ष सन 2017 करीता भारत निवडणूक आयोग व मा.मुख्य निवडणूक अधिकारी यांचे निर्देशाप्रमाणे राबविण्यात येणाऱ्या संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रम व निरंतर पुनरिक्षण कार्यक्रमांतर्गत वाशिम जिल्ह्यातील 3 विधानसभा मतदार मदत केंद्रावर नमुना 6.7.8 व 8अ ची ऑनलाईन पध्दतीने डेटा एंट्री करणे, त्याच प्रमाणे आयोगाचे निर्देशानुसार पुरविण्यात आलेल्या विविध आज्ञावलीमध्ये डाटा एंट्रीचे काम करणेकरीता डाटा एन्ट्री ऑपरेटर ची नियुक्ती करावयाची आहे.

डेटा एंट्री ऑपरेटर पुरविणेविषयी अनुभवी व सुयोग्य स्थानिक अभिकर्ता नियुक्त करण्यासाठी शासन निर्देशानुसार फेर ई निविदा मागविण्यात येत आहे. सदर फेर ई निविदेचा कार्यक्रम खालील प्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| कोरा निविदा फॉर्म | रु.1,000/- |
| ईसारा रक्कम | रु. 25,000/- |
| सुरक्षा ठेव | रुपये 1,00,000/- |
| निविदा प्रसिध्द करणे | दिनांक 25/09/2017 सकाळी 11.00 वाजता |
| निविदा उपलब्ध कालावधी | दिनांक 25/09/2017 सकाळी 11.00 पासुन<br>दिनांक 03/10/2017 दुपारी 5.00 पर्यंत |
| प्रीबीड कॉन्फरंस घेणे (निविदा पुर्व बैठक) | दिनांक 27/09/2017 दुपारी 3.00 वाजता<br>जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांचे दालनात |
| संपर्क अधिकारी | श्री सुनिल कोरडे, उपजिल्हा निवडणूक अधिकारी, वाशिम 07252 -232852 |
| निविदा अर्जाची किंमत व इसारा रक्कम ऑनलाईन भरणेचा कालावधी | दिनांक 25/09/2017 सकाळी 11.00 वाजता<br>दिनांक 03/10/2017 दुपारी 5.00 पर्यंत |
| निविदा अपलोड व प्रत्यक्षात सादर करणेचा अंतिम दिनांक | दिनांक 03/10/2017 दुपारी 5.00 वाजेपर्यंत |
| निविदा उघडणेचा दिनांक | दिनांक 05/10/2017 दुपारी 3.00 वाजता |
| निविदा उघडणेचे ठिकाण | जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी वाशिम यांचे दालनात |
| सदर ई निविदा www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. | |

जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक
अधिकारी

# जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी वाशिम यांचे कार्यालय

Ph.No-07252232852
E-mail-dydeowashim@gmail.com Fax No-07252232858

## अटी व शर्ती

1. लिफाफा अ (तांत्रिक लिफाफा) मध्ये निविदा अर्जासह खालील कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे.

- ईसारा रक्कम व निविदा अर्जाची रक्कम या दोन्ही रकमा SBI NET BANKING द्वारे भरणा करावयाचे आहे.(निविदा अर्जाची किंमत 1000/- व इसारा रक्कम 25000/- )
- विक्रीकर नोंदणी प्रमाणपत्र व सेवाकर नोंदणी प्रमाणपत्राची साक्षांकीत प्रत तसेच सन डिसेंबर 2016 अखेरचे सेवाकर भरल्याचे विवरणपत्र तसेच सन 2015-16 विक्रीकर नादेय प्रमाणपत्र
- कोणत्याही शासकीय/निमशासकीय कार्यालयात डेटा एंट्री ऑपरेटर चा पुरवठा केल्याचा तपशिल व प्रमाणपत्र तसेच केलेल्या कामाचा कार्यारंभ आदेश व काम समाधानकारक रित्या केल्याचे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक .
- निविदा धारकाने डेटा एंट्री साठी लागणारे मनुष्यबळ उपलब्ध असल्याचा तपशिल (किमान 20 डेटा एंट्री ऑपरेटर यांचे नाव, पत्ता, शैक्षणीक अर्हता, संगणक अर्हता व अनुभव याबाबतची माहिती ) जोडणे आवश्यक आहे. सदर डाटा एंट्री ऑपरेटर यांची या कार्यालयाचे स्तरावर कामाचे अनुभवाबाबत खात्री करण्याकरीता मुलाखत घेण्यात येतील.
- सन 2013-14, 2014-15, 2015-16 या आर्थीक वर्षाचे आयकर विवरणपत्र जोडणे आवश्यक आहे.
- मागील तीन वर्षांपैकी किमान एक वर्षाची आर्थिक उलाढाल 25,00,000/- किंवा त्यापेक्षा अधिक असणे आवश्यक राहील. त्यासाठी मागील तीन वर्षाच्या उलाढालीचा अंकेक्षण अहवाल सादर करणे आवश्यक आहे.
- निविदेत नमुद करण्यात येणारे दर हे Minimum Wages Act 1984 अंतर्गत येणाऱ्या या दरापेक्षा कमी असल्यास ती निविदा ग्राह्य धरण्यात येणार नाही.
- काळा यादीत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र.
- GST Registration Certificate.
- सदर निविदेकरीता निविदाधारकाने अपलोड केलेली कागदपत्रे खरी असल्याबाबतचे स्वयंघोषणापत्र.

1. लिफाफा अ (तांत्रिक लिफाफयातील) अटी व शर्ती पुर्ण करणाऱ्या निविदाधारकाच्या दराचा लिफाफा ब (व्यापारी दरपत्रकाचा लिफाफा) उघडणेत येईल.
2. ज्या ठेकेदाराला काम मंजुर करण्यात येईल त्यांना कामाचा आदेश देणेपुर्वी त्यांचेकडुन रक्कम रुपये 100/- रुपयाच्या बॉंड पेपरवर अटी व शर्तीसह बंधपत्र लिहुन घेण्यात येईल. तसेच सुरक्षा अनामत रक्कम रुपये 1,00,000/- (अक्षरी रुपये एक लक्ष फक्त) चा राष्ट्रीयकृत बॅंकेचा धनाकर्ष DEPUTY DISTRICT ELECTION OFFICER WASHIM यांचे नावे देणे आवश्यक आहे.
3. नियुक्त करण्यात येणारे डाटा एंट्री ऑपरेटर हे संबंधीत मनुष्यबळ पुरवठा करण्याऱ्या संस्थचे असल्याने त्यांचे मानधन संबंधीत संस्था अदा करील. याकरीता संबंधीत संस्थेस कोणत्याही प्रकारचे अग्रिम मंजुर करण्यात येणार नाही. सदर डाटा एंट्री ऑपरेटर हे कोणत्याही प्रकारे शासनाच्या अथवा जिल्हाधिकारी यांच्या आस्थापनेवर नियुक्त राहणार नाही किंवा या आस्थापनेवर हक्क प्रस्तापित करु शकणार नाही.

4. नेमुन दिलेल्या तारखेस कळविण्यात आलेल्या संख्येनुसार व ठिकाणी डाटा एंट्री ऑपरेटरचा पुरवठा करावा लागेल. संबंधीत मतदार संघाच्या अधिकारी यांनी निश्चित केलेल्या वेळी डाटा एंट्री ऑपरेटर यांनी उपस्थित राहणे बंधनकारक राहील. डेटा एंट्रीच्या कामाची वेळ संबंधीत मतदार नोंदणी अधिकारी /उपजिल्हा निवडणूक अधिकारी यांचे निर्देशानुसार राहील.
5. दैनंदीन डेटा ऐन्ट्री कामाचा अहवाल जिल्हा निवडणूक कार्यालयास देणे बंधनकारक आहे.
6. सन 2017-18 या आर्थीक वर्षासाठी हा ठेका मयार्दीत आहे. सेवा समाधानकारक असल्यासच पुढील काम देण्यात येईल.
7. या कामाचे देयक उपजिल्हा निवडणूक अधिकारी वाशिम यांचे नावे पाठविणेचे असुन त्या सोबत प्रत्येक डेटा एंट्री ऑपरेटरचे हजरी पत्रक व संबंधीत मतदार नोंदणी अधिकारी/सहायक मतदार नोंदणी अधिकारी यांचे कामकाज समाधानकारक असल्याचे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील. काम समाधानकारक व बिनचुकरित्या पुर्ण झालेनंतर तसेच केलेल्या कामाची पडताळणी केल्यानंतर बिलाची रक्कम अदा केली जाईल.
8. मंजुर निविदाधारक काम करणेस असमर्थ ठरल्यास इतर कोणत्याही संस्था/व्यक्ती कडुन काम करुन घेण्यात येईल व त्या बाबत संबधीताने आकारलेल्या देयकानुसार जादा खर्च झाल्यास फरकाची रक्कम निविदाधारकाकडुन वसुल करण्यात येईल.
9. निविदेमध्ये नमुद दरामध्ये प्रत्यक्ष डेटा एंट्री ऑपरेटरने केलेल्या प्रती एंट्रीचे सर्व समावेशक चार्जेस समाविष्ट असावेत. ज्या निविदेमध्ये निश्चित दर दिलेले नसतील अथवा दिलेल्या दरामध्ये संदिग्धता असेल अशी निविदा नकारली जाण्यास पात्र राहील.
10. निविदा धारकाने नमुद केलेले दर हे सर्व करासह असावेत.
11. निविदाधारकास इतर कोणत्याही शासकीय कार्यालयाने प्रतिबंधीत (Black listed) केले असल्याचे आढळुन आल्यास अशा निविदाधारकास निविदा प्रक्रीयेतुन बाद करण्यात येईल.
12. निविदा मंजुर करणे अगर नाकारणे आवश्यक वाटल्यास विभागुन देणे शर्ती बदलणे हे अधिकार जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी राखुन ठेवले आहेत.
13. निविदे सोबत सादर केलेले सर्व मुळ कागदपत्रे निविदा उघडते वेळी सोबत असणे आवश्यक आहे.
14. विहीत मुदतीत काम पुर्ण न केल्यास दर दिवशी रक्कम रुपये 1000/- दंड आकारण्यात येईल तो शासकीय खजिन्यात जमा करावा लागेल.
15. वरील अटी व शर्तीचे उल्लंघन केल्यास निविदाधारक फौजदारी कारवाईस पात्र राहील तसेच त्यांची सुरक्षा अनामत रक्कम जप्त केली जाईल.

29/4/16

जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक
अधिकारी